# नवाब मलिकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश



**मुंबई :** नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) मुंबईचे माजी विभागीय संचालक समीर वानखेडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते आणि नवाब मलिक यांच्यावर दिल्लीतील केंद्रीय अनुसूचित जाती आयोगात तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे मलिक यांच्या अडचणीत आणखी भर पडण्याची शक्यता आहे, कारण मलिक यांच्यावर सात दिवसांमध्ये गुन्हा दाखल करून चौकशी करण्याचे आदेश मुंबई पोलिसांना देण्यात आले आहेत. केंद्रीय अनुसूचित जाती आयोगाने याआधीच मुंबई पोलिसांना आयोगासमोर उपस्थित राहण्यासाठी समन्स दिला होता. मुंबई पोलिसांकडून अतिरिक्त आयुक्त प्रवीण पडवळ यांनी या सुनावणीसाठी हजेरी लावली होती. राज्य अनुसूचित जात पडताळणी समितीकडून होणाऱ्या तपासाचा अहवाल राष्ट्रीय अनुसूचित आयोगाला सोपावण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.


मंगळवार, १ फेब्रुवारी २०२२

◆ वर्ष १४ ◆ अंक १९५

www.ramprahar.com

# राम प्रहर

◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


## अंतरंग


दूषित पाणीपुरवठ्यामुळे खारघर भाजप आक्रमक/३

अडकलेल्या ट्रेकर्सची आठ तासांनंतर सुटका/४

राजनाला कालवा परिसरातील शेतकऱ्यांना अडथळे/५



(छाया : लक्ष्मण ठाकूर) अधिक छायाचित्रे पान ६ वर..



# ऑफलाइन परीक्षेविरोधात विद्यार्थी उतरले रस्त्यावर

## शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या घरासमोरही आंदोलन; पोलिसांचा लाठीचार्ज





**मुंबई : प्रतिनिधी**

ऑफलाइन परीक्षेविरोधात राज्यातील इयत्ता दहावी आणि बारावीचे विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. परीक्षा ऑनलाइन घ्यावी या मागणीसाठी मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, उस्मानाबाद, अकोला आदी ठिकाणी मोठ्या संख्येने विद्यार्थी सोमवारी (दि. ३१) रस्त्यावर उतरले. धारावीत शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या घरासमोरही विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी लाठीचार्ज केला. त्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी परीक्षा ऑफलाइन आणि वेळापत्रकानुसारच होणार असल्याचे सांगितले होते, मात्र हा निर्णय विद्यार्थ्यांना मान्य नाही. शिक्षणमंत्र्यांनी परीक्षा ऑफलाईन घेण्याचे जाहीर केल्यानंतर सोशल मीडियावरदेखील विद्यार्थ्यांकडून या विरोधात प्रतिक्रिया उमटल्या होत्या. त्याचा उद्रेक होऊन परीक्षा ऑनलाइन घेण्यात यावी, अशी मागणी करीत राज्यात अनेक ठिकाणी विद्यार्थी सोमवारी रस्त्यावर उतरले.

कोरोना रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत असल्याने वर्षभर शाळा ऑनलाइन होत्या. ऑनलाइन शिक्षण दिल्यानंतर परीक्षा ऑफलाइन का, असा सवाल आंदोलक विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्री आणि राज्य सरकारला केला आहे. ऑफलाइन परीक्षा घेणे योग्य नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळू नका, असे सांगत दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी एल्गार पुकारला.

धारावीमध्येही मोठ्या संख्येने विद्यार्थी जमले होते. विद्यार्थ्यांचा आक्रमक पवित्रा पाहून शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी नमते घेत प्रतिक्रिया दिली. आम्ही चर्चा करण्यासाठी तयार आहोत. त्यानुसार आम्ही शिक्षणतज्ज्ञांशीदेखील चर्चा करू. विद्यार्थ्यांच्या काही सूचना असतील तर त्या ऐकण्यासाठी सरकार व शिक्षण विभाग तयार आहे, असे शिक्षणमंत्री गायकवाड यांनी सांगितले.

# कुडाळच्या ‘बिलिमारो’ने जिंकला मानाचा अटल करंडक

## राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण

**पनवेल : प्रतिनिधी**


**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेलमध्ये आयोजित करण्यात आलेली राज्यस्तरीय अटल करंडक स्पर्धा कोण जिंकणार याची अवघ्या महाराष्ट्राला लागलेली उत्सुकता अखेर रविवारी (दि. ३०) संपली. तीन दिवस चाललेल्या महाअंतिम फेरीत कुडाळ येथील ‘ढ’ मंडळी या संस्थेच्या बिलिमारो एकांकिकेने बाजी मारत एक लाख रुपये आणि मानाच्या आठव्या अटल करंडकावर आपले नाव कोरले.** (पान २ वर..)





### एकांकिकेतून चांगले कलाकार घडतात -नितीन देसाई

अटल करंडक स्पर्धेचे हे पारितोषिक महत्त्वाचे आहे, कारण या स्पर्धेतून पुढे आलेल्या कलाकारांनी महत्त्वाचे योगदान मराठी रंगभूमीला दिलेले नंतर पाहायला मिळते. नाटकाच्या एकांकिकेत जो उभा राहतो तो नेहमीच चांगला कलाकार असतो. म्हणून मी आजच्या निमित्ताने तुमचे महाराणा प्रताप सिरीजच्या ऑडिशनसाठी स्वागत करतो, असे खुले आवताण सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी कलाकारांना दिले.



### भावी काळातील तुम्ही चमकते तारे -लोकनेते रामशेठ ठाकूर

अध्यक्षीय भाषणात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, भावी काळातील तुम्ही चमकते तारे असणार आहात. तुमचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. आपल्यासारखी नाट्यवेडी मंडळी खऱ्या अर्थाने मराठी संस्कृती जागृत ठेवण्याचे काम करतात. मराठी माणूस ज्या क्षेत्रात जातो तेथे ध्येयवेडा होतो. राजकारण आणि समाजकारण या क्षेत्रात काम करणे आणि कला गाजवणे हा फार मोठा गुण आहे. त्या दृष्टीने तुम्ही फार मोठे कलाकार व्हा. मोठी व्यक्ती व्हा, असा मी तुम्हाला आशीर्वाद देतो.

### कलाकारांना प्रोत्साहन देण्याचा उद्देश -सभागृह नेते परेश ठाकूर

अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा आमच्यासाठी अभिमानास्पद आहे. श्री. रामशेठ ठाकूर सामजिक विकास मंडळाच्या माध्यमातून आम्ही सन २००५मध्ये मल्हार नाट्य करंडकाद्वारे रायगड जिल्हास्तरीय नाट्य स्पर्धा सुरू केली होती. यामध्ये आमचा हेतू अतिशय प्रामाणिक असा होता तो म्हणजे येथील कलाकारांना प्रोत्साहन देणे, कलेला उत्तेजन देणे आणि याद्वारे कलेची सेवा करणे. पनवेल परिसरात जास्तीत जास्त नाट्य संस्कृतीचा प्रचार व्हावा यासाठी प्रयत्न करणे या उद्देशाने आम्ही स्पर्धा सुरू केली होती. मग राज्यातील इतर जिल्ह्यांपर्यंत पोहचण्यासाठी २०१४ साली अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार आम्ही ही अटल करंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा सुरू केली. तेव्हापासून आम्हाला चांगला प्रतिसाद लाभलेला आहे, कारण या स्पर्धेच्या आयोजनाच्या मागे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा अतिशय मोलाचा सहभाग आहे, असे नमूद करून अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे उपाध्यक्ष व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आपल्या प्रास्ताविकात मंडळाने आतापर्यंत राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

पनवेल महापालिकेच्या वतीने मी उपस्थित सर्वांचे स्वागत करते. आज मराठीमध्ये दिग्गज कलाकार आल्याने मराठी रंगभूमी, चित्रपट व नाटकांना सोनेरी दिवस आले असे म्हणायला हवे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेलमध्ये नाट्यगृह झाल्यावर अतिशय उत्कृष्ट, दर्जेदार नाटके आणि विविध स्पर्धा इथे होत आहेत. त्यामुळे आपल्यासारख्या कलाकारांची भेट होते. आपण पनवेलमध्ये येऊन स्पर्धेत भाग घेतल्याबद्दल आभार व सगळ्यांना शुभेच्छा!

**-डॉ. कविता चौतमोल,** महापौर

अटल करंडक एकांकिका स्पर्धा राज्यस्तरीय आहे. गावापासून शहरापर्यंत सर्व स्तरातील कलाकार यामध्ये स्फूर्तीने भाग घेतात. स्पर्धक एकत्र येतात तो क्षण आम्हाला अनुभवायला मिळतो, जो आजच्या घडीला तितकाच अत्यंत महत्त्वाचा आहे. तोच प्रवास प्रत्येक एकांकिका आणि कलाकाराचा आहे. ही केवळ एक स्पर्धा नाही, तर चळवळ म्हणून चालवली जाते.

**-ओमकार भोजने,** स्पर्धेचा ब्रँड ॲम्बेसिडर

# देशाचा जीडीपी आठ टक्के राहण्याचा अंदाज

## अर्थमंत्र्यांकडून आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सोमवार (दि. ३१) पासून राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अभिभाषणाने सुरुवात झाली. त्यानंतर लोकसभेत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला. यात २०२२-२३मध्ये देशाचा आर्थिक विकास दर (जीडीपी) आठ ते ८.५ टक्के असेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

देशाचा आर्थिक सर्वेक्षण आर्थिक व्यवहार विभागाने तयार केले आहे. त्यानुसार कृषी क्षेत्रात ३.९ टक्के, उद्योग क्षेत्रात ११.८ टक्के, तर सेवा क्षेत्रात ८.२ टक्के वाढीचा अंदाज आहे. महागाईचा दर नियंत्रणात राहील, असेही सांगण्यात आले आहे.

### आज सादर होणार अर्थसंकल्प

अर्थमंत्री निर्मला सीतारामन दरवर्षीप्रमाणे १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता लोकसभेत अर्थसंकल्प सादर करतील. अर्थमंत्री सीतारामन यांचा हा चौथा अर्थसंकल्प आहे. या वर्षी कररचनेत बदल होण्याची शक्यता आहे, तर स्टार्टअप् कंपन्यांसाठी काही विशेष तरतुदी लागू होऊ शकतात. याशिवाय रेल्वेच्या बजेटमध्ये सुरक्षेला प्राधान्य आणि महत्त्वाच्या बाबींवर भर दिला जाण्याची चिन्हे आहेत.

# ‘निलंबन रद्द केलेल्या आमदारांना विधानभवनात प्रवेश देण्यात यावा’

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभेने भाजपच्या १२ आमदारांचे केलेले एक वर्षांचे निलंबन हे सर्वोच्च न्यायालयाने अवैध, घटनाबाह्य व अतार्किक ठरवून रद्द केले असल्याचे विधानभवन सचिवांना पत्र लिहून भाजप आमदार ॲड. आशिष शेलार यांनी अवगत केले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार यापुढे या आमदारांना विधानभवनात प्रवेश खुला झाल्याकडेही सचिवांचे त्यांनी लक्ष वेधले आहे.

भाजप नेते आमदार ॲड. शेलार यांनी विधानसभा सचिवांना पत्र लिहून न्यायालयाने दिलेल्या आदेशाची कायदेशीर माहिती सचिवांना अवगत केली असून सोबत निवाड्यांची प्रतही जोडली आहे.

## निवडक

### अखिलेश यादवांविरुद्ध केंद्रीय मंत्री मैदानात

**लखनऊ :** भारतीय जनता पक्षाने मोठी खेळी करीत समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्याविरुद्ध केंद्रीय राज्यमंत्री एस. पी. सिंह बघेल यांना उमेदवारी दिली आहे. बघेल सोमवारी (दि. ३१) मैनपुरी येथे दाखल झाले आणि त्यांनी करहल विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. अखिलेश यांनी येथे आधीच अर्ज भरला असून त्यांच्यासमोर आता कडवे आव्हान असणार आहे.

### प्रचार रॅली, सभांवरील बंदी ११ फेब्रुवारीपर्यंत कायम

**नवी दिल्ली :** देशातील कोरोना रुग्णांची संख्या लक्षात घेऊन निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणुका होणार असलेल्या पाच राज्यांमध्ये रॅली, सभा, रोड शोवर असलेली बंदी ११ फेब्रुवारीपर्यंत कायम ठेवली आहे. दुसरीकडे घरोघरी प्रचारासाठी फक्त पाच जणांनाच परवानगी होती, परंतु आता २० जणांना निवडणूक आयोगाने परवानगी दिली आहे.

# कर्जतची खुशी पुन्हा झळकणार चित्रपटात

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतमधील चिमुरडी कलाकार खुशी हजारे ही ‘आपडी थापडी’ या चित्रपटातून पुन्हा एकदा पडद्यावर झळकणार आहे. सुप्रसिद्ध अभिनेता श्रेयस तळपदेच्या मुलीची भूमिका ती साकारणार आहे. खुशीने यापूर्वी बालकलाकार म्हणून अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनसोबत काम केलेले आहे.

श्रेयस तळपदेने त्याच्या वाढदिवसाच्या दिवशी आपल्या आगामी चित्रपटाची बातमी चाहत्यांसोबत शेअर केली. बऱ्याच कालावधीनंतर श्रेयस मराठी चित्रपटसृष्टीकडे वळलेला पाहायला मिळाला. त्याने साकारलेली ‘माझी तुझी रेशीमगाठ’ ही मालिका सध्या प्रेक्षकांची विशेष दाद मिळवताना दिसत आहे. लवकरच श्रेयस ‘आपडी थापडी’ या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.




नुकतेच या चित्रपटाचे चित्रिकरण सुरू करण्यात आले असून श्रेयससोबत अभिनेत्री मुक्ता बर्वे मुख्य भूमिकेत झळकणार आहे.

आपडी थापडी चित्रपटाचा पहिला प्रोमो नुकताच प्रेक्षकांच्या समोर आला आहे. यात संदीप पाठक, नंदू माधव, नवीन प्रभाकर हे कलाकारसुद्धा महत्त्वाची भूमिका बजावताना दिसणार आहेत. या चित्रपटात कर्जतची खुशी हजारे, मुक्ता बर्वे आणि श्रेयस तळपदे यांच्या मुलीच्या भूमिकेत दिसणार आहे. खुशीने याआधी विकी कौशलसोबत ‘भूत’, ऐश्वर्या रायसोबत ‘सरबजीत’, खानदानी शफाखाना असे बॉलीवूड चित्रपटांत बालकलाकार म्हणून अभिनय केला आहे, तसेच वजनदार आणि प्रवास या मराठी चित्रपटातदेखील ती झळकली आहे.

चित्रपटासोबतच खुशीने टीव्ही जाहिरात क्षेत्रातदेखील काम केले आहे. खूप लहान असतानाच खुशीने पॅम्पर्स पॅन्टच्या ॲडमध्ये काम केले होते. ही तिची पहिली जाहिरात ठरली. गोल्डी गुलाबजाम, लेन्सकार्ट तसेच नुकतीच ब्रिटानिया गुड्डेची एक नवी ॲड टीव्हीवर पाहायला मिळाली. या ॲडमध्ये खुशीदेखील झळकली आहे. त्यामुळे खुशी एक बालकलाकार म्हणून बॉलीवूड, तसेच मराठी चित्रपटसृष्टीत चांगलीच ओळखली जाऊ लागली आहे.

# ‘...तर ते किराणा दुकान, सुपर शॉपी फोडून टाकणार’



**औरंगाबाद : प्रतिनिधी**

ऑल इंडिया मजलिस ए इत्तेहादूल पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार इम्तियाज जलील यांनी किराणा दुकान आणि सुपर शॉपीत वाईन विक्रीला परवानगी दिल्याच्या निर्णयावर थेट ठाकरे सरकारला आव्हान दिले आहे. सत्ताधारी सर्व पक्षांनी हिंमत असेल, तर औरंगाबादमध्ये किराणा दुकान किंवा सुपर शॉपीत वाईन शॉप उघडून दाखवावे. ते दुकान फोडण्याची जबाबदारी माझी असेल, असे खासदार जलील यांनी म्हटले आहे.

खासदार जलील पुढे म्हणाले की, संपूर्ण महाराष्ट्र सरकार, शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसला मी आव्हान देतो. तुमच्यात हिंमत असेल, तर औरंगाबादमध्ये कोणत्याही किराणा दुकान किंवा सुपर शॉपीत वाईन शॉप उघडून दाखवा. किराणा दुकानात एक जरी वाईन शॉप सुरू झाले, तर मी स्वतः आणि माझे कार्यकर्ते ते फोडतील. इतकेच नाही तर महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज, फुले-आंबेडकरांना मानणाऱ्या जनतेला आणि माझ्या आया-बहिणींनी जिथे किराणा दुकानात वाईन दिसेल ते दुकान फोडावे.

# पेणमध्ये पोलीस कस्टडीतून पळालेला आरोपी सुरक्षा रक्षकामुळे पुन्हा अटकेत

**पेण : प्रतिनिधी**

पेण पोलिसांच्या ताब्यातून पलायन केलेल्या आरोपीला पुन्हा अटक करण्यात आली आहे. एका बँक सुरक्षा रक्षकाच्या सतर्कतेमुळे या आरोपीला पकडण्यात यश आले आहे.

वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाबळ कार्ली गावात पोकलेन ऑपरेटर राजेंद्र यादव (वय ४२, रा. झारखंड) याच्यावर त्याचा सहाय्यक असलेला बिरू गणेश महातो (वय १९, रा. झारखंड) याने किरकोळ कारणावरून धारदार कोयत्याने वार करून त्यास गंभीर जखमी केले होते. या प्रकरणी वडखळ पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपी बिरू महातो याला अटक केली होती. आरोपीला पेण पोलीस ठाण्याच्या कस्टडीमध्ये ठेवण्यात आले होते. या आरोपीला रविवारी प्रातर्विधीसाठी बाहेर काढण्यात आले होते. त्या वेळी त्याने शौचालयाच्या बाजूस असलेल्या भिंतीवरून उडी मारून मागील बाजूने पलायन केले. त्यामुळे पोलिसांची एकच धावपळ उडाली होती.

या आरोपीचा जवळपास अख्खे पोलीस ठाणे व गुन्हे अन्वेषण पथक परिसरात शोध घेत होते. या दरम्यान पेण शहरातील अभ्युदय बँकेच्या परिसरात एक व्यक्ती दुपारपासून संशयास्पदपणे फिरत असल्याचे तेथील सुरक्षा रक्षकाला दिसले. त्याने पेण पोलिसांना फोन केला. पोलीस तिथे गेल्यानंतर ही व्यक्ती जेलमधून पळून गेलेला आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी आरोपीला पकडले असून पुन्हा अटक करण्यात आली आहे.

# उलवे नोडमध्ये वृक्षारोपण

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दिला वृक्षसंवर्धनाचा संदेश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे उलवे नोड २ चे उत्तर भारतीय सेलचे अध्यक्ष अवधेश महतो यांच्या सौजन्याने रविवारी (दि. ३०) वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उलवे नोड सेक्टर १७ प्लॉट क्रमांक ४६ मध्ये आयोजित केलेल्या या कार्यक्रमात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देत वृक्षारोपण केले.



या वेळी पनवेल पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, भाजपचे उलवे नोड अध्यक्ष अनंताशेठ ठाकूर, तालुका चिटणीस जयवंत देशमुख, ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, उषा देशमुख, महिला मोर्चा उपाध्यक्ष सुजाता पाटील, वसंतशेठ पाटील, कमलाकर देशमुख, सुधीर ठाकूर, भार्गव ठाकूर, किशोर पाटील, आशिष घरत, विशाल म्हात्रे, रघुनाथ देशमुख, प्रकाश शिवलकर, अवधेशकुमार महतो, नरेंद्रनाथ तिवारी, डेविस सर, बादल देव, अभिषेक भट्टाचार्य, तुकाराम तोडक, नरेंद्र पोळ, अमोल पाटील, धनंजय तांबे, शरद चौधरी, अविनाश काजबजे, सागर रंधवे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागर रंधवे यांनी केले, तसेच धनंजय तांबे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमास सेक्टर १७ मधील ग्रीन व्हीव, नीलकंठ प्राइड, मोहन रेसिडेन्सी, ड्रीम हेरिटेज, तेजस हाईट्स, साईऑर्चिड, आरएमएस डायमंड, हाऊसिंग सोसायटी या सोसायटीमधील सदस्य उपस्थित होते.

# 'सीकेटी'त लिंग समानता विषयावर व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज पनवेल (स्वायत्त)च्या इंग्रजी विभागामार्फत लिंग समानता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी एस. एस. ए. कॉलेज, सोलापूरच्या प्रा. डॉ. अस्मा खान (इंग्रजी विभाग) प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

या व्याख्यानामध्ये प्रा. डॉ. अस्मा खान यांनी लिंग समानता व पारंपरिक लिंग भेदाच्या खुळचट कल्पनावरती प्रकाश टाकला. त्या वेळी त्यांनी भारताच्या रूढी, परंपरा चालीरीती, तसेच स्त्रियांच्या उन्नतीसाठी मारक असणाऱ्या वेगवेगळ्या संकल्पनेवर हल्ला चढवला. शेवटी त्यांनी भारताच्या उन्नतीसाठी लिंग समानता हा एक सक्षम मार्ग होऊ शकतो, असे सांगितले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, कला शाखाप्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील आदी प्राध्यापक व इंग्रजी विभागाचे विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविकामध्ये विभागाचे प्रमुख डॉ. राजेश येवले यांनी प्रास्ताविक केले, तसेच प्रा. सूर्यकांत परकाळे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व प्रा. रूपाली आगलावे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन मनाली महाडिक हिने केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य




प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राजेश येवले, प्रा. सूर्यकांत परकाळे व प्रा. रूपाली आगलावे यांनी विशेष परिश्रम घेतले. या नावीन्यपूर्ण विषयावर व्याख्यान आयोजित केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी इंग्रजी विभागाचे कौतुक केले.

## अभीष्टचिंतन

**पनवेल : भाजप युवा मोर्चा महापालिका सरचिटणीस केदार भगत यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, तसेच सुमित दसवते, नितेश भगत, योगेश साळवी, हर्षद गडगे, संकेत दसवते, भावेश शिंदे, सचिन जाचक, गौरव सावंत, साहिल मोरे, जयदीप भगत, मंगेश भगत, निखिल भगत, यज्ञेश पाटील, अनिकेत सावंत, अनिल पशिलकर, शेषनाथ गायकर, मयूर पाटील, ब्रिजेश बहिरा, श्रेयस शिंदे, चैतन्य भगत, कपिल कुरघोडे, नेहाल गायकर आदी उपस्थित होते.**



## दुखवटा

### गणपत हजारे

**कर्जत :** नेरळ गावातील ज्येष्ठ कार्यकर्ते गणपत धर्मा हजारे यांचे वयाच्या ८६व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. नेरळ गावातील सामाजिक कार्यकर्ते रायगड जिल्हा मध्यवर्ती शहरी बँकेचे संचालक राजेंद्र हजारे यांचे ते वडील होत.

### देवदास सँमसन

**मुंबई :** अंबरनाथ येथील ज्येष्ठ पत्रकार देवदास सँमसन (वय ८३) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अंबरनाथ नगरपालिकेच्या सेवेतही ते होते. सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी पूर्णवेळ पत्रकारिता केली. ते अंकशास्त्र ज्योतिष विद्येचेही जाणकार होते.


**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF THE Xth ADDL. DIST. JUDGE AND ADDL. M.A.C.T., BELAGAVI, AT: BELAGAVI**
**M.V.C. No. 1028/2021**

**BETWEEN:**
1 Shri: Ashish @ Ajit B. Shinde ... PETITIONER
**AND:**
1) Cholamandalam General Insurance Co. Ltd.
And another ... RESPONDENTS

To,
The Respondent No.1
Smt: Surekha W/o. Suresh Shinde
Age: Major, Occ: Transport Business,
R/o: Flat No.201, Vivasana CHS,
2nd Floor, Plot No.46, Sec No.13,
Khanda Col, Dist: Raigarh,
State: Maharashtra-410206
(Owner of Trailer No. MH-46/BB-7071)

Whereas the above named petitioner is filed the petition against you and others, claiming the compensation an amount of Rs.25,00,000/- on account of injury sustained by Shri: Ashish @ Ajit S/o. Balasaheb @ Baban Shinde in a Motor Vehicle Accident, when the petitioner was proceeding in your Trailer No. MH-46/BB-7071 as a cleaner along with Shri:Sandeep Shinde who was driving the said Trailer at Vengal Rao Nagar, near Shivalayam Temple and near B.T. Road, out skirts of Sathupalli, at that time, your driver of Trailer No. MH-46/BB-7071 driven by it's driver in a in a very high speed, rashly, negligently and without following traffic rules, all of a sudden applied the brakes to keep away from oncoming one unknown vehicle, due to the said jerk the 7" x 7" x 20' iron blocks which were loaded in the Trailer moved towards cabin and stroked to Trailer cabin and thereby caused the accident and the said accident is occurred on 20-05-2017 at about 12:30 a.m. and thereafter the petitioner have filed the claim petition in the court, the Hon'ble court has issued notice through R.P.A.D. to your address, but the said R.P.A.D. cover has returned as "Left Addressee".

Therefore, take the notice that, the top numbered petition has been posted on **04-03-2022** for your appearance and to file an objection to the petition if any, TAKE NOTICE that, in case of your failure to appear on the said date aforesaid at 11.00 a.m. the case will be heard and proceeded and placing you as a ex-parte.

Given under my hand and the seal of this office on this 27th day of January 2022.

Seal

Sd/-
( M.V. Angadi )
Advocate for Petitioners

Sd/-
(Chief Administrative Officer)
District & Session Court, Belagavi.


## पान १ वरून

### कुडाळच्या 'बिलिमारो'ने जिंकला मानाचा अटल करंडक

सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा किताब बिलिमारो एकांकिकेमधील रंगा, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा किताब हायब्रिड एकांकिकेमधील ज्ञानेश्वरी मंडलिक हिने पटकाविले. मराठी रंगभूमीला समृद्ध करणारे ज्येष्ठ दिग्दर्शक प्रकाश बुद्धिसागर यांना 'गौरव रंगभूमीचा' जीवन गौरव पुरस्काराने या वेळी सन्मानित करण्यात आले. ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उपाध्यक्ष व महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे दरवर्षीप्रमाणे नेटके व दिमाखदार आयोजन करण्यात आले होते. पारितोषिक वितरण समारंभही उत्साहात झाला.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रसाद कांबळी, महापौर डॉ. कविता चौतमोल, स्पर्धेचे ब्रँड अ‍ॅम्बेसिडर ओमकार भोजने, अभिनेते मंगेश कदम, परीक्षक सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते विजय केंकरे, सुप्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे, सुप्रसिद्ध लेखक व अभिनेता संजय मोने, सुप्रसिद्ध लेखक डॉ. नितीन आरेकर, सुप्रसिद्ध अभिनेता भरत सावले, 'हास्य जत्रा'फेम शिवाली परब, वनिता खरात, निखिल बने, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सुप्रसिद्ध सिने-नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, श्री. व सौ. नील कोठारी, स्पर्धा सचिव श्यामनाथ पुंडे, प्राथमिक फेरीचे परीक्षक अभिजीत झुंजारराव, प्रमोद शेलार, अमोल खेर, स्मिता गांधी, गणेश जगताप, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष मयूरेश नेतकर, सरचिटणीस चिन्मय समेळ, शहर अध्यक्ष रोहित जगताप, सांस्कृतिक प्रकोष्ठच्या कोकण विभाग सहसंयोजिका अक्षया चितळे, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, संजीव कुलकर्णी आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सुप्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई पुढे म्हणाले की, आज मला आनंद होत आहे, कारण ३३ वर्षांपूर्वी मीसुद्धा तुमच्या जागी होतो. याच तुमच्या पद्धतीने २५ जागांमध्ये निवड होऊन आपल्याला पारितोषिक मिळणार का याची वाट पाहत होतो. माझ्या आयुष्याचा पहिला सेट मी नाटकाचा लावलेला, तोही एकांकिका स्पर्धेचा. मी आता ३३ वर्षांनंतर एक महत्त्वाकांक्षी प्रयोग करतोय. महाराणा प्रताप यांच्यावर मोठी सिरिज करतोय. मला असे वाटतेय की एवढे स्पर्धक इथे आलेत. त्यांच्यासाठी आपण एन.डी. स्टुडिओत ऑडिशन ठेऊया. स्टेजवर बोलून तुमच्यावर संस्कार करण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा मला असे वाटते की प्रत्यक्षात काही तरी घडवायला पाहिजे. या वेळी त्यांनी स्पर्धेत झालेल्या १०८ एकांकिका पाहण्याची इच्छाही व्यक्त केली.

या वेळी नितीन देसाई यांनी ठाकूर पिता-पुत्रांचे कौतुक केले. ते म्हणाले, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एवढे कार्य केले आहे. प्रशांतजी आणि परेशजीदेखील इतके काही करताहेत, तर माझ्या माध्यमातूनही काही करावे असे वाटते. आपल्या महाराष्ट्रात, या रायगडमध्ये भरपूर कलाकार आहेत. फक्त कमी पडतो आत्मविश्वास आणि पुढे जाण्याची जिद्द. भारतीय चित्रपटसृष्टी दादासाहेब फाळके या मराठी माणसाने उभारली. त्यानंतर कोट्यवधींचे त्यामध्ये भांडवल येऊन ही इंडस्ट्री फोफावली, पण आपण थोडेसे कोठेतरी त्यामध्ये मागे असू, म्हणून माझा एक खारीचा वाटा आहे. आपण त्यामध्ये कोठे तरी पुढे जावे यासाठी मी माझ्या कार्यक्रमात किंवा प्रोजेक्टमध्ये आपल्या लोकांना स्थान देत असतो. आजच्या निमित्ताने मी तुम्हाला आवाहन करतो की महाराणा प्रताप सिरीजमध्ये मी तुमचे सगळ्यांचे ऑडिशनसाठी स्वागत करतो.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, लहानपणी आपण कोणत्या क्षेत्रात चमकणार हे माहिती नसते. चांगली दिशा घेतली असेल आणि त्याला घडवण्याचे डायरेक्ट-इनडायरेक्ट प्रयत्न लहानपणी केले, तर भावी काळातील एक मोठे व्यक्तिमत्त्व तयार झालेले आपल्याला दिसते. मीही असाच एक गरीब मजुरी करणारा मुलगा होतो, पण शिक्षण झाले. शिक्षकाची नोकरी लागली. मला मराठी वाङ्मयाची आवड होती. साहित्याची गोडी असल्याने नाटक बघायला जाण्याचा मला छंद होता. मी वेळ मिळेल तेव्हा ठाण्याला गडकरी रंगायतन, दादरला शिवाजी मंदिर, रवींद्र नाट्य मंदिर ते विलेपार्ले पर्यंत जात होतो. मी प्रशांत आणि परेशला घेऊन जात असे. त्या वेळी मला माहीत नव्हते की, पुढे जाऊन ते अशा एकांकिका स्पर्धा भरवतील. आज तुम्ही उभ्या महाराष्ट्रातून आलात. आम्हाला आमच्या आयुष्यात जे जमले नाही ते काम तुम्ही छानपैकी केलेत याचा मला अभिमान आहे.

**✻ स्पर्धेचा सविस्तर निकाल ✻**

**सर्वोत्कृष्ट एकांकिका**

प्रथम क्रमांक-बिलिमारो ('ढ' मंडळी, कुडाळ) एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांक-मानलेली गर्लफ्रेंड (इंद्रधनू, मुंबई) ५० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-हायब्रीड (ऍबस्ट्रॅक्ट थिएटर, डोंबिवली) २५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-मौनांतर (नागाबादेवी कलामंच, वसई) १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-चिऊताई चिऊताई दार उघड (स्पॉट लाईट, पनवेल) पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-जनावर (प्राण, मुंबई) पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट अभिनेता (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-रंगा (बिलिमारो) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-सुनील हरिश्चंद्र (मानलेली गर्लफ्रेंड) एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-शांती (बिलिमारो) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-भावेश कुटला (हायब्रीड) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-मल्हार (मौनांतर) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट अभिनेत्री (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-ज्ञानेश्वरी मंडलिक (हायब्रिड) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-निहारिका राजदत्त (मानलेली गर्लफ्रेंड) एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-अर्चिता मोरे (राकस) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-सिद्धी शिंदे (लेखक) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-सायली रोंधळ (विषाद) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-बिलिमारो (दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), द्वितीय क्रमांक-मानलेली गर्लफ्रेंड (एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), तृतीय क्रमांक-नितीन सावळे (हायब्रिड) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-चिऊताई चिऊताई दार उघड (५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), उत्तेजनार्थ-मौनांतर (प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह)

**सर्वोत्कृष्ट लेखक (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-सुनिल हरिश्चंद्र (मानलेली गर्लफ्रेंड) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-तेजस म्हस्के (बिलिमारो) एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-रोहन साटम (मौनांतर) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-प्रसाद पंडित (साबण) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-नितीन सावळे (हायब्रिड) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट संगीत (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-बिलिमारो, दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-प्रसाद, (रुईया) एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-अक्षय धांगट (राकस), एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-चिऊताई चिऊताई दार उघड, ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-हर्ष-विजय (विषाद) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-रोहित श्रीष (पार्वती सदर), दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-चिऊताई चिऊताई दार उघड, एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-मानलेली गर्लफ्रेंड, एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-आशिष पवार (हायब्रिड) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-कविता निकाळजे (विषाद) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-प्रसाद (रुईया) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-चिऊताई चिऊताई दार उघड, एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक- राजेश शिंदे (हायब्रिड) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-जनावर, ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ-बिलिमारो (सचिन कोंडास्कर) प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट रंगभूषा (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-किशोर नाईक, दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-प्रणेश लोगडे एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-कुणिका पाटील, एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-राहुल मौले, ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**सर्वोत्कृष्ट वेशभूषा (वैयक्तिक)**

प्रथम क्रमांक-किशोर नाईक, दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-श्रेया जयराम म्हात्रे, एक हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-आशिष एकनाथ पवार, एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, चतुर्थ क्रमांक-विनय महादेव गोडे, ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

**✻ रायगड जिल्हा प्राथमिक फेरीकरिता विशेष पारितोषिके ✻**

प्रथम क्रमांक-किरण सोष्टे, १० हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक-डॉ. पी. आर. करुळकर, सात हजार ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, तृतीय क्रमांक-गणेश जगताप, पाच हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.

सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका-साबण (मुद्रा कल्याण) सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, महाराष्ट्रातील अस्सल मायबोली एकांकिका-विषाद (रंगपंढरी पुणे) सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, लोककलेवर आधारित एकांकिका-राकस (कलासक्त मुंबई) सात हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट विनोदी कलाकार-राहुल शिरसाठ (साबण) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, सर्वोत्कृष्ट बालकलाकार-वरद पाटील (मौनांतर) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह.





## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**मंगळवार, दि. १ फेब्रुवारी २०२२ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. क्रीडा संकुल, एचओसी, पनवेल
- ३. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ४. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. ज्ञानसाधना केंद्र, सेक्टर ६, कामोठे ■ ९. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अ‍ॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १२. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १३. आंबेडकर भवन, पनवेल ■ १४. सेंट्रल रेल्वे, पनवेल ■ १५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली
- १६. मनस्मृती रोटरी सेंटर, खारघर

### कोवॅक्सिन

- १. काळभैरव कार्यालय, कळंबोली ■ २. आयटीएम कॉलेज, नवीन पनवेल
- ३. काळण समाज हॉल, पनवेल (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ४. निमिष हेल्थ सेंटर, खारघर (१५ व १८ वर्षांवरील वयोगटासाठी)
- ५. न्यू इंग्लिश स्कूल, कळंबोली

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- आसुडगाव राजीप शाळा
- धरणा कॅम्प राजीप शाळा
- रोडपाली राजीप शाळा
- पिसार्वे राजीप शाळा
- पापडीचा पाडा राजीप शाळा
- फरशीपाडा राजीप शाळा

### १५ ते १८ वयोगटाचे लसीकरण

- **कोकण एज्युकेशन सोसायटी के. व्ही. हायस्कूल पनवेल (उपलब्ध लसी ५००)**
- **सेंट जोसेफ हायस्कूल, खांदा कॉलनी (५००)**
- **केशरचंदजी आनंदरामजी बांठिया शाळा न्यू पनवेल (५००)**
- **सी. के. ठाकूर विद्यालय मराठी इंग्रजी माध्यमिक, न्यू पनवेल (५००)**
- **एस. ई. एस. मराठी माध्यमिक हायस्कूल कळंबोली (५००)**
- **केपीसी स्कूल, खारघर (५००)**
- **रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, खारघर (५००)**
- **एपीजे स्कूल, खारघर (५००)**
- **सुषमा पाटील मराठी-इंग्रजी माध्यम हायस्कूल कामोठे (५००)**
- **एम.ए. दत्तूशेठ पाटील मराठी, इंग्रजी माध्यमिक प्राथमिक शाळा कामोठे (४३१)**

# दिवाळे गाव होणार स्मार्ट व्हिलेज

## आमदार मंदा म्हात्रे यांचा पाहणीदरम्यान विश्वास

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबईतील दिवाळे गाव हे दत्तक घेतले आहे. त्या पार्श्वभूमीवर सोमवारी (दि. ३१) आमदार मंदा म्हात्रे यांनी पाहणी दौरा केला. या वेळी त्यांनी नवी मुंबईतील पहिले स्मार्ट व्हिलेज म्हणून दिवाळे गाव उदयास येणार असल्याचे सांगितले.

स्मार्ट व्हिलेज अंतर्गत दिवाळे गावात सर्व सुविधांयुक्त मच्छी मार्केट, उद्यान, मासे सुकविण्यासाठी प्लॅटफॉर्म, स्टेज, समाज मंदिर, स्वाध्याय हॉल, प्रसाधनगृहे, लहान मुलांकरिता खेळणी, विरंगुळा केंद्र, गजेबो गार्डन, बहुउद्देशीय इमारत, ओपन जिम, चारचाकी वाहनतळ, भाजी व फळ मार्केट, तसेच सुशोभीकरण करण्यात येणार असून त्याकरिता १५ कोटी रुपये अपेक्षित खर्च करण्यात येणार आहे. याकरिता आमदार निधीची तरतूदही करण्यात येणार आहे. दिवाळे गाव हे स्मार्ट व्हिलेज म्हणून तयार होणार असल्याने स्थानिकांना रोजगार, चांगले शिक्षण, आरोग्य सुदृढ होण्यास मदत मिळणार आहे. स्वच्छता व सार्वजनिक उपक्रमाला चालना मिळणार आहे.

दिवाळे गाव आमदार मंदा म्हात्रे यांनी दत्तक घेतल्यानंतर या गावामध्ये विविध नागरी सुविधांचा विकास होत आहे. गावकऱ्यांसाठी शासकीय योजना आणल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार म्हात्रे यांनी गावाचा पाहणी दौरा केला.

या वेळी भाजप महामंत्री निलेश म्हात्रे, माजी नगरसेविका भारती कोळी, शहर अभियंता संजय देसाई, कार्यकारी अभियंता अजय संखे, विद्युत विभागाचे सुनील लाड, बेलापूर विभाग अधिकारी डॉ. मिताली संचेती, संजय पाटील, कैलास गायकवाड, अनंता बोस यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



### ‘इतरही गावांचा विकास करणार’

*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा, याकरिता प्रत्येक गाव हे स्मार्ट व्हिलेज तयार करावे असे स्वप्न साकारले आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील गाव दत्तक योजना साकारत आहे. सन २००४ सालापासून दिवाळे गाव हे मी दत्तक घेतले असून हे गाव भविष्यात स्मार्ट व्हिलेज होणार आहे. दिवाळे गाव हा माझा पायलट प्रोजेक्ट असून त्याच धर्तीवर बेलापूर मतदारसंघातील इतर गावेही स्मार्ट व्हिलेज म्हणून उदयास येणार आहेत, असे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.*

# दूषित पाणीपुरवठ्यामुळे भाजप खारघर मंडल आक्रमक

## उपोषण करण्याचा सिडकोला इशारा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

मागील १५ दिवसांपासून खारघर सेक्टर १२ जी टाईपमधील वसाहतीत दूषित व दुर्गंधीयुक्त पाण्याचा पुरवठा होत आहे. या तांत्रिक दोषाचे निवारण लवकर होत नसल्याने खारघर भाजप मंडलाच्या शिष्टमंडळाने पाच दिवसांत यावर उपाय निघाला नाही किंवा संपूर्ण पाईपलाईन बदलाचा निर्णय घेतला गेला नाही, तर सिडको कार्यालय सेक्टर चार येथे उपोषणाला बसण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अनेक नागरिक उलट्या, जुलाब व पोटदुखीमुळे त्रस्त झाले आहेत. काही नागरिक दवाखान्यात ॲडमिट झालेले आहेत. यासंदर्भातील प्रिस्क्रिप्शन निवेदनासह सिडको अधिकारी चेतन देवरे यांना देण्यात आले.



स्थानिक नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, हर्षदा उपाध्याय व उपाध्यक्ष रमेश खडकर यासंदर्भात पाठपुरावा करीत आहेत.

सरचिटणीस दीपक शिंदे यांनी या दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या जिवाशी बेतले, तर याला सर्वस्वी सिडको प्रशासन जबाबदार असेल शिवाय नागरिकांच्या आरोग्याशी खेळण्याचा सिडकोला काही अधिकार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. उपोषणासंदर्भाचे निवेदनपत्र देताना मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे व उपाध्यक्ष दिलीप जाधव उपस्थित होते.

# विधिज्ञ नईमा घट्टेंच्या पनवेल कार्यालयाचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अलिबागच्या युवा विधिज्ञ नईमा इमरान घट्टे यांच्या पनवेलमधील नव्या कार्यालयाचे उद्घाटन पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून अलिबागचे नगराध्यक्ष प्रशांत नाईक उपस्थित होते.

पनवेल न्यायालयात होणाऱ्या कामकाजामध्ये असंख्य प्रकरणे असतात. गोरगरीब नागरिक ग्रामस्थ तसेच विविध लोकांना कायदेशीर प्रक्रियेत या कार्यालयाचा उपयोग होईल, असे मत सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केले. प्रशांत नाईक यांनीदेखील या वेळी शुभेच्छापर विचार मांडले.

या वेळी भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष पिंपरी चिंचवड प्रभारी सय्यद अकबर, पनवेलचे नगरसेवक मुकीत काझी, भाजपचे इफ्तिकार अत्तार, कैसर दणदणे, उरणच्या माजी उपनगराध्यक्ष नाहिदा ठाकूर, रशीद ठाकूर आदी उपस्थित होते. इमरान घट्टे यांनी सर्वांचे स्वागत व आभार व्यक्त केले.





### भूमिपूजन

**कामोठे : सामाजिक कार्यकर्ते प्रदीप गजानन भगत आणि पनवेल महापालिका प्रभाग समिती ‘क’च्या सभापती अरुणा भगत यांच्या पाठपुराव्यामुळे सेक्टर २२ येथील छत्रपती शिवाजी महाराज उद्यान येथे नवीन वॉकिंग ट्रॅक बनविण्यात येणार आहे. त्याचे भूमिपूजन रविवारी करण्यात आले. या वेळी प्रभागातील नागरिक उपस्थित होते. त्यांनी अरूणा भगत यांचे आभार मानले.**

# दिघाटीत श्री गणेश जन्मोत्सवानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिघाटी येथील नवतरुण गणेश मित्र मंडळाच्या वतीने गणेश मंदिरात धर्मनाथ बिज प्राणप्रतिष्ठा व गणेश जन्मोत्सव कथात्रिवेणी संगम देव भक्त आणि तीन दिवस हरिपाठ व कीर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. २ ते ४ फेब्रुवारी दरम्यान हे सर्व कार्यक्रम होणार आहेत.

यामध्ये पहाटे ४ ते ६ काकडा, सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ, रात्री ९ ते ११ कीर्तन हरिजागर होईल. या श्रवण सेवेचा, तीर्थप्रसादाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

या कार्यक्रमांना भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, दिघाटीचे सरपंच अमित पाटील, साईचे माजी सरपंच आण्णा पाटील, पुंडलिक ठाकूर, रमेश पाटील आदींची उपस्थिती लाभणार आहे.

आमदार महेश बालदी यांच्या फंडातून गणेश मंडळ सभा मंडपाकरिता १४ लाख रुपयांची देणगी देण्यात आली आहे. त्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग काशिराम पाटील यांनी आभार मानले आहेत. कार्यक्रमाचे व्यवस्थापक दिघाटी येथील नवतरुण गणेश मित्र मंडळ, ग्रामविकास परिवर्तन आघाडी, दुर्गादेवी मित्र मंडळ, गुरुवार वाचक मंडळ, ग्रामस्थ मंडळ हे आहेत.

# वृक्षारोपण करून दिला वडिलांच्या आठवणींना उजाळा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा परिसरातील प्रेस फोटोग्राफर असणारे चंद्रकांत हसू मुंढे यांच्या वडिलांचे निधन झाले आहे. आपल्या वडिलांच्या मृत्यूनंतर चंद्रकांत मुंढे यांनी समाजसेवक, पत्रकार मित्र यांच्या हस्ते वृक्षारोपण करून आठवण जोपासली आहे.

चांभार्ली येथील कै. हभप हसूराम दगडू मुंढे (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांना लहानपणापासूनच वृक्षारोपण करण्याची आवड असल्याने पर्यावरण वाचविण्यासाठी ते नेहमीच वृक्षलागवड करायचे. त्यामुळे वडिलांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी त्यांचा मुलगा प्रेस फोटोग्राफर चंद्रकांत मुंढे यांनी आपले सहकारी पत्रकार मित्र, समाजसेवक यांच्या हस्ते घरासमोरील जागेत चंदन, बेल आदी वृक्षांची लागवड केली, तसेच दोन वर्षांपूर्वी आईंचे निधन झाल्यानंतरही प्रेस फोटोग्राफर चंद्रकांत मुंढे यांच्या कुटुंबीयांनी वृक्षारोपण केले होते. आपल्या आई वडिलांची कायमची आठवण राहावी यासाठी वृक्षारोपण करत असल्याचे चंद्रकांत मुंढे यांनी सांगितले.

दरम्यान, कै. हभप हसूराम दगडू मुंढे यांचा दशक्रिया विधी रविवारी (दि. ६) गुळसुंदे येथे होणार असून उत्तरकार्य बुधवारी (दि. ९) चांभार्ली येथील घरी होणार आहे.



**कामोठे : पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांना वाढदिवसानिमित्त कामोठे केमिस्ट असोसिएशनकडून शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी कामोठे केमिस्ट असोसिएशनचे पदाधिकारी सुधीर पाटील, हेमंत लोणकर, विजय रायसोनी, मदन शिरवी, विकास कनवार आदी उपस्थित होते.**

# फुंडे हायस्कूलमध्ये बापूंना अभिवादन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तु. ह. वाजेकर विद्यालयात रविवारी (दि. ३०) राष्ट्रपिता महात्मा गांधी स्मृतिदिन आणि हुतात्मा दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.



विद्यालयाच्या स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम. एच. पाटील, उपमुख्याध्यापक व्ही. एल. नरवडे, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे यांच्या हस्ते महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सुरुवातीला मृदुला म्हात्रे आणि मंदार म्हात्रे या विद्यार्थ्यांनी ‘वैष्णव जन तो तेणे कहीये’ ही प्रार्थना सादर केली. तर किशोर शिंदे (सातवी), स्नेहल शिंदे (आठवी) या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. त्यानंतर ज्येष्ठ शिक्षक एस. टी. म्हात्रे आणि प्रा. डी. पी. सासवडे यांनी आपल्या भाषणात बापूजी महात्मा गांधींचे जीवनकार्य सांगितले. त्यानंतर उपशिक्षक आर. जी. शेळके यांनी ‘दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल’ या गीताचे सादरीकरण केले.

या वेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रार्थना, स्वावलंबन, सत्कृत्य, हस्तोद्योग, वक्तृत्व स्पर्धा, शालेय परिसर स्वच्छता हे उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एच. एन. पाटील यांनी केले, तर दर्शना माळी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व सेवकांचे सहकार्य लाभले.

# ‘दिशा’कडून विधवा महिलांना हळदीकुंकवाचा मान

**पनवेल : वार्ताहर**

दिशा महिला मंच आयोजित हळदीकुंकू समारंभ ‘ती’च्या नजरेतून या उपक्रमाचे आयोजन कामोठे येथील आगरी हॉल या ठिकाणी करण्यात आले होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे नेहमीप्रमाणेच हळदीकुंकूची सुरुवात विधवा महिलांना हळदीकुंकवाचा मान देऊन करण्यात आली.

पूर्वापार चालत आलेल्या रुढीला बाजूला सारून सर्वसामान्य स्त्रीप्रमाणे तिलाही समाजात तोच मानसन्मान मिळावा हीच भावना ठेऊन हळदीकुंकूचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत गॅलेक्सी सर्फक्टंट्स लि. सीएसआरचे प्रमुख आदर्श नायर व चिरायू हॉस्पिटलच्या डायरेक्टर डॉ. स्वाती हांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. या वेळी डॉक्टरांनी महिलांना आपल्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी यावर मार्गदर्शन केले, तर आदर्श नायर यांनी उपक्रमाचे कौतुक करत महिला सक्षमीकरणासाठी सदैव व्यासपीठाबरोबर नेहमीच काम करू, असेही आश्वासन दिले.



गॅलेक्सी सर्फक्टंट्स लि.च्या अंतर्गत महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी कंपनीच्या मॅनेजर वैशाली जुमडे व टीमच्या मार्गदर्शनाने महिलांना साबण बनवणे, डिशवॉश लिक्विड, डिटर्जंट लिक्विड, हॅन्डवॉश लिक्विड बनविण्याचे प्रशिक्षण या वेळी देण्यात आले व त्याचबरोबर घरी पाच साबण बनवता येतील एवढे साहित्याही महिलांना देण्यात आले. पुढील काळामध्येही असे वेगवेगळे प्रशिक्षण देऊन महिलांना उद्योजिका बनवण्यासाठी व्यासपीठातून प्रयत्न केले जातील असे दिशा व्यासपीठाच्या संस्थापिका निलम आंधळे यांनी या वेळी सांगितले.

‘ती’च्या अस्तित्वाचे हक्काचे व्यासपीठ असल्यामुळे त्या प्रत्येक महिलेला व्यासपीठावर मानसन्मान दिला जातो. व्यासपीठाच्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांनी कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा सांभाळली.

महिलांच्या व्यवसायाबद्दल माहिती सांगून त्यांच्या व्यवसाय वृद्धीसाठी नेहमीच प्रयत्नशील राहू, असेही या वेळी त्या म्हणाल्या. खुशी सावर्डेकर यांनी सर्वांचे आभार मानले. सर्व सख्यांच्या सहकार्याने उत्तम जबाबदारीने कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.



### पाम बीचवर कंटेनर उलटला

**नवी मुंबई :** येथील पाम बीच मार्गावर कोपरी गावाजवळ कंटेनर उलटल्याने अपघात झाला आहे. या अपघातात कंटेनरचालक जखमी झाला असून या मार्गावर वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

मालाने भरलेला कंटेनर वाशीतल्या एपीएमसी मार्केटमधून ठाण्याच्या दिशेने जात होता. कोपरी गावाचा सिग्नल क्रॉस करत असताना अचानक बाईकस्वारमध्ये आडवा आल्याने त्याला वाचवण्यासाठी कंटेनर चालकाने इमर्जन्सी ब्रेक दाबला. त्या वेळी कंटेनर रस्त्यावर उलटला. यात कंटेनरचालक जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर वाहतूक पोलीस कंटेनर बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. मेटल (धातू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य असणारी कंपनी कोणती?**
***अ.)*** टाटा स्टील ***ब.)*** जेएसडब्लू स्टील ***क.)*** हिंदाल्को ***ड.)*** वेदांता

**२. एफएमसीजी (फास्ट मुव्हिंग कन्झुमर गुड्स – जीवनावश्यक वस्तू) क्षेत्रातील भारतातील सर्वाधिक बाजारमूल्य कोणत्या कंपनीचे आहे?**
***अ.)*** हिंदुस्थान युनीलिव्हर ***ब.)*** गोदरेज कन्झुमर ***क.)*** नेस्ले इंडिया ***ड.)*** कोलगेट पॉमोलिव्ह इंडिया

**३. भारतातील आतापर्यंतचा सर्वांत मोठ्या रकमेचा आयपीओ कोणता?**
***अ.)*** कोल इंडिया ***ब.)*** जनरल इन्शुरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया
***क.)*** रिलायन्स पॉवर ***ड.)*** वन ९७ कम्युनिकेशन्स लिमिटेड (पेटीएम)

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# विद्यार्थ्यांचा हिसका

विद्यार्थी अथवा पालकांशी कुठलाही संवाद न साधता, त्यांच्या मतांची पर्वा न करता राज्य सरकारने दहावी आणि बारावीच्या परीक्षा ऑफलाइन पद्धतीनेच होतील हे जाहीर करून टाकले होते. या निर्णयाच्या विरोधात आंदोलनाचे लोण पसरले ते मात्र समाजमाध्यमांवर संचार असणाऱ्या हिंदुस्थानी भाऊ ऊर्फ विकास फाटक नावाच्या इसमाने केलेल्या आवाहनानुसार असे सांगितले जाते. प्रकरण हाताबाहेर जात आहे हे पाहून शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांबद्दल चर्चा केली जाईल असा पवित्रा आता घेतला आहे. चर्चेचे हे पाऊल सरकारने आधीच उचलले असते तर विद्यार्थ्यांवर आंदोलनाची वेळच आली नसती.

**एरव्ही कुठलाही आवाज न करता शांतपणे अडचणीला सामोरा जाणारा विद्यार्थीवर्ग पेटून उठला की काय घडते याचे प्रत्यंतर महाविकास आघाडी सरकारला सोमवारी आले असेल. सत्तेपुढे शहाणपण टिकत नसते याचा इतक्या वेळा अनुभव महाराष्ट्रातील नागरिकांना गेल्या दोन वर्षांत आला आहे की त्याची गणतीच होणार नाही. शेतकऱ्यांपासून व्यापाऱ्यांपर्यंत समाजातील प्रत्येक घटक आज नाराज आहे. विद्यार्थीवर्ग इतके दिवस शांतपणे सारे काही सोसत होता. त्याचा सोमवारी स्फोट झाला. तसा तो होणार याची भीती वाटत होतीच. गेली दोन वर्षे सगळेच विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने जमेल तसे शिक्षण घेत आहेत. खाजगी कार्यालयेदेखील वर्क फ्रॉम होम पद्धतीनेच चालत आहेत. कोरोनाच्या कचाट्यातून आपण अजुनही पुरते बाहेर आलेलो नाही याचाच हा पुरावा आहे. विद्यार्थीवर्गानेच नेमके सरकारचे काय घोडे मारले आहे हे मात्र कळावयास मार्ग नाही. सोमवारी अचानक शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या धारावीतील निवासस्थानी विद्यार्थ्यांची गर्दी जमा होऊ लागली. बघता बघता स्थिती नियंत्रणाबाहेर जाते की काय असे वाटू लागले. विद्यार्थ्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी लाठीमार केला. विद्यार्थ्यांवर होणारी दंडेलशाही सरकारला महागात पडेल हे वेगळे सांगायची गरज नाही. हे आंदोलन भडकवण्याच्या आरोपाखाली कथित संबंधित हिंदुस्थानी भाऊला पोलीस ताब्यात घेणार असल्याचेही कळते, परंतु त्याचा संदेश समाजमाध्यमांवर व्हायरल झाला तेव्हा सरकार काय करत होते? आंदोलनाचे लोण मुंबईपासून थेट जळगाव, औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, नागपूर, कोल्हापूर आदी ठिकाणी पसरले. आता शिक्षणमंत्र्यांनी चर्चेचा शहाजोग पवित्रा घेतला आहे, परंतु निर्णय जाहीर करण्याआधीच संबंधितांशी चर्चा करता आली असती. परीक्षा ऑनलाइन घ्यायच्या की ऑफलाइन हा निर्णय वाटतो तितका सोपा नाही. तो घेण्यापूर्वी विद्यार्थी प्रतिनिधी, पालकांचे प्रतिनिधी आणि शिक्षणतज्ज्ञांशी साधकबाधक चर्चा सरकारने केली असती तर बऱ्याच गोष्टी सुकर झाल्या असत्या. ऑनलाइन परीक्षा शहरी भागांत शक्य असल्या तरी ग्रामीण महाराष्ट्रामध्ये ते अडचणीचे ठरू शकते, परंतु या सरकारला कोणाशीच संवाद साधण्याची इच्छा नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. उलटपक्षी आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवर लाठीमार करून सरकारने विद्यार्थीवर्गाबद्दलचा आपला दूषित दृष्टिकोन सिद्धच केला आहे. सरकारच्या या दंडूकेशाहीचा धिक्कार करावा तितका थोडा आहे. प्रकरण हाताबाहेर गेल्यानंतर शिक्षणमंत्र्यांनी मंगळवारी या संदर्भात तातडीची बैठक बोलावली आहे. त्यातून काय मार्ग निघतो हे आता बघायचे. तथापि, विद्यार्थीवर्गाने आपला हिसका राज्य सरकारला दाखवला हे एका अर्थी बरेच झाले. अन्यथा सरकारमधील बजबजपुरीचे खापर नेहमीप्रमाणे विरोधा पक्षावर फोडून हे सरकार गप्प बसले असते.**

# महाडची शान डॉ. हिम्मतराव बावस्कर

स्वराज्याची राजधानी महाडमध्ये!
स्वराज्य जननी जिजाऊंची समाधी महाडमध्ये!
छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी महाडमध्ये! डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या समता चळवळीचे चवदारतळे महाडमध्ये!
दासबोधाचे जन्मस्थान शिवथरघळ महाडमध्ये!
सम्राट अशोक कालीन बौद्धलेणी महाडमध्ये!
सी. डी. देशमुखांचे जन्मगाव महाडमध्ये!
आणि आता पद्मश्री पुरस्कार महाडमध्ये!

महाड या ऐतिहासिक आणि सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या भूमीत, अनेक विचारवंत जन्माला आले. रक्ताचा एकही थेंब न सांडता जंजिरा संस्थान स्वतंत्र भारतात विलीन करणारे क्रांतिसिंह नानासाहेब पुरोहित हे याच महाडच्या भूमीतील. वनराईचे संस्थापक कै. मोहन धारिया, दादासाहेब सावंत, समतेची चळवळ उभारणारे अमलकांत टिपणीस, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त इतिहासतज्ज्ञ प्रभाकर भुस्कुटे, स्वराज्याचे शिलेदार मुरारबाजी देशपांडे, नरवीर तानाजी मालुसरे, राजे महाडिक अशी एक ना अनेक नररत्ने याच भूमीने दिली.


कोकणात विंचू व सर्पदंशाने मृत्युमुखी पडणाऱ्या हजारो जणांना प्रभावी लस तयार करून जीवदान देण्याचे काम करणारे डॉ. हिम्मतराव बावस्कर हे या रत्नांपैकी एक. ज्यांनी सामान्य कुटुंबात जन्माला येऊन आपल्यातील असामान्यत्व सिद्ध करून दाखवले. संपूर्ण देशात अत्यंत मानाच्या समजल्या जाणाऱ्या पद्मश्री पुरस्कारासाठी डॉ. हिम्मतराव बावस्कर यांची केंद्र सरकारने केलेली निवड ही त्यांच्या आजवरच्या संशोधनाचे सार्थक आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्याचे श्रेय डॉ. बावस्कर यांनी आपले सर्व सहकारी आणि महाडकरांना दिले, हा त्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. अत्यंत साधी राहणीमान असणारे डॉ. बावस्कर समोर आले तर या माणसामध्ये असामान्य संशोधक दडला आहे, हे जाणवतदेखील नाही.

जालना जिल्ह्यामधील भोकरदन तालुक्यातील देहेड या खेडेगावात अत्यंत गरीब कुटुंबात जन्मलेले डॉ. हिम्मतराव बावस्कर यांनी लाकूडतोड, हॉटेलात कपबशा धुणे यांसह अनेक प्रकारचे कष्ट करून शालेय शिक्षण पूर्ण केले. इंटर सायन्समधील यशानंतर त्यांनी नागपूरच्या मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. या शिक्षणात प्रा. के. डी. शर्मा यांनी दिलेला 'पॅथॉलॉजी इज द मदर ऑफ मेडिकल सायन्स' हा गुरुमंत्र



हिम्मतराव कोळून प्यायले. रोगाच्या मुळाशी जाऊन नोंदींच्या दस्ताऐजीकरणावर त्यांनी भर दिला. कोकणात विंचू व सर्पदंशामुळे अनेक निष्पापांचे जीव जात असल्याचे पाहून डॉ. बावस्कर यांना स्वस्थ बसवेना आणि त्यांनी सर्प व विंचूदंशामुळे होणाऱ्या मृत्यूच्या मुळाशी जाण्याचे ठरवले.

**खबरबात**
**महेश शिंदे**



महाड तालुक्यातील बिरवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात १९७६च्या सुमारास डॉक्टरांची नियुक्ती झाली. तेव्हापासून सरकारी दवाखान्यातील सेवेचा वस्तुपाठच त्यांनी घालून दिला. खाजगी किंवा पैसे घेऊन सेवेला थारा दिला नाही. या भागात विंचूदंशामुळे लोक दगावताहेत, हे समजल्यावर त्यांनी त्यांची कारणे, त्याचे परिणाम यांचा सखोल अभ्यास केला. डोळ्यादेखत हृदय पिळवटून टाकणारे मृत्यू ते पाहत होते. १९७६-७७ या काळातील २० केसेसचा अहवाल त्यांनी तयार केला व तो हाफकिन, जेजे येथील तज्ज्ञांना दाखवला. डॉ हिम्मतराव बावस्करांच्या नोंदींच्या पुराव्यासह १९७८ मध्ये सर्वप्रथम 'लॅन्सेट' या लंडनच्या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिकात एक अहवाल प्रसिद्ध तर झाला, परंतु त्यात डॉ. बावस्करांना तिसरे स्थान होते. त्यानंतर मात्र त्यांनी विंचूदंशाच्या ५१ प्रकरणांचा अभ्यास करून स्वतः शोधनिबंध तयार केला. लॅन्सेटने तो प्रकाशित केला. नंतर औंध येथे राहून त्यांनी एमडी केले व त्यादरम्यान विंचूदंशाची पार्श्वभूमी डोळ्यापुढे ठेवून वैद्यकीय संदर्भग्रंथांचे वाचन केले. विंचूदंशावर परिणामकारक औषध कोणते, यावर त्यांनी विचार केला. सोडिअम नायट्रोप्रूसाइडचे द्रव्य इंजेक्शनद्वारे प्रभावी ठरेल, असे त्यांनी निश्चित केले. दरम्यान, डॉ. प्रमोदिनी यांच्याशी विवाहबद्ध होऊन डॉ. बावस्कर दाम्पत्य पोलादपूर येथे १९८२मध्ये रुग्णसेवेत रुजू झाले. त्याच काळात प्रथम आठ वर्षांच्या रुग्णाला विंचूदंशावर हे इंजेक्शन लागू पडले, मात्र ते प्राथमिक आरोग्य केंद्रात देणे जोखमीचे होते. तेव्हा याला पर्याय म्हणून तोंडावाटे घ्यावयाच्या प्राझोसीन या औषधाच्या वापराचा शोध त्यांना लागला. हा उपचार प्रभावी ठरल्याचा डॉ. हिम्मतरावांचा प्रबंध १९८६ साली लॅन्सेटमध्ये प्रसिद्ध झाला. पुण्याहून आणलेले सोडिअम नायट्रोप्रुसाइड हे इंजेक्शन आणि डॉ. बावस्कर पती-पत्नींनी डोळ्यात तेल घालून रात्रभर त्या मुलावर केलेले उपचार यातून एक पथदर्शी यश हाती आले. जन्मदात्या पित्याच्या अंत्यसंस्कारालाही ते या वेळी जाऊ शकले नव्हते. नांदवीच्या या मुलाच्या रूपाने पोलादपूरच्या प्राथमिक केंद्रात हिम्मतरावांच्या आमूलाग्र संशोधनाची नांदी झाली होती. या उपचारांची महत्ता इतकी की कोकण, कर्नाटक, आंध्र प्रदेश, पुद्दूचेरी, गुजरात या भागातील विंचूदंशाने होणारे मृत्यूचे प्रमाण ४० टक्क्यांवरून एक टक्क्याखाली आले. १९९३ मध्ये याच संशोधनाचे सादरीकरण करण्यासाठी सीबा फाउंडेशनने हिम्मतरावांना लंडनमध्ये निमंत्रित केले. २०११मध्ये प्राझोसिन आणि प्रतिलस यांच्या परिणामकारकतेविषयी त्यांचा प्रबंध ब्रिटिश मेडिकल जर्नलमध्ये प्रकाशित झाला. फुरसे, कांबळ्या, मण्यार, कोब्रा (नाग) या विषारी सापांच्या दंशातून होणारा वेगवेगळा परिणाम व त्यावरची स्वतंत्र उपचारपद्धती याचा त्यांनी अभ्यास केला. सर्पदंशावरील प्रतिलस कशी द्यावी, कोणते औषध देऊ नये, याचे मार्गदर्शन केले. त्याविषयी 'रॉयल सोसायटी ऑफ लंडन'च्या जर्नलमध्ये त्यांचा प्रबंधही प्रकाशित झाला.

डॉ. हिम्मतराव बावस्करांचे संशोधन विंचू व सर्पदंशापुरते मर्यादित राहिले नाही. बुलढाणा व अकोला जिल्ह्यात रासायनिक खतांमुळे जलस्त्रोतांमध्ये कॅडमिअम व शिसे यांचा संसर्ग होऊन शेतकऱ्यांमध्ये मूत्रपिंड निकामी होण्याचा गंभीर आजार दिसून येत होता, हा निष्कर्ष त्यांनी क्लिनिकल टॉक्सिकॉलॉजी या प्रबंधात मांडला. कूपनलिकांमधील पाण्यामध्ये फ्लुरॉइडचा अंश असल्याने दाताला फ्लुरॉसिसचा आजार जडत असल्याचे त्यांनी दाखवून दिले. हायपोथॉयराइड हे अनेकविध आजारांच्या मुळाशी कसे असते, हे त्यांनी सांगितले. या डॉक्टर दाम्पत्याने असे १०८ शोधनिबंध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित केले. स्मृतिभ्रंशाच्या आजाराचे वेळेत निदान करण्यासंबंधी त्यांनी संशोधन केले. कानाला पडलेल्या भेगा हे हृदयरोगाचे लक्षण असते, हे त्यांनी ८८८ रुग्णांच्या तपासणीनंतर अनुमान काढले. बदलत्या जीवनशैलीमुळे होणारी बी१२ जीवनसत्त्वाची कमतरता याविषयी त्यांनी मौलिक विवेचन केले. पेट्रोल पंप, गॅरेज कामगार, सुरमा वापरणारे यांच्या शरीरात शिशाचा अंश जास्त झाल्याने होणारे परिणाम त्यांनी दाखवून दिले. डॉ. हिम्मतराव बावस्करांनी त्यांचे सर्व संशोधन स्वतःच्या अर्थबळावर केले. सरकारी सेवेत रुग्णाकडून कधी पैसा घेतला नाही, उलट त्यांनाच पैसे दिले. प्रसंगी २४ तास रुग्णाबरोबर जागून काढले. काही वर्षांपूर्वी हिम्मतरावांना एका पॅथॉलॉजी प्रयोगशाळेकडून रुग्ण पाठवल्याबद्दलचा हिस्सा म्हणून एक धनादेश आला. या लॅबने डॉक्टरचे नाव वाचले नसावे. हिम्मतरावांनी हे प्रकरण मेडिकल कौन्सिलपर्यंत नेले व कट प्रॅक्टिसवर हल्ला चढवला.

'पुरस्कार मिळाला, तर एक माणूस मोठा होईल, पण आपल्याला अनेक माणसे मोठी करायची आहेत,' असे डॉ. बावस्कर म्हणतात. 'दहा दिवसांनी रुग्ण आपल्या पायावर चालत येतो, या इतका मोठा पुरस्कार नाही, रुग्ण हेच माझे दैवत,' असे डॉ. हिम्मतराव बावस्कर आजही मनोभावे सांगतात. डॉ. बावस्कर यांच्या रूपाने एक रत्न लाभले असून त्यांना जाहीर झालेला पद्मश्री पुरस्कार हा समस्त महाडकरांचा गौरव आहे.

# अडकलेल्या ट्रेकर्सची आठ तासांनंतर सुटका

## यशवंती हायकर्स, निसर्ग मित्र मदतीला



(छाया : विनायक माडे)

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील माणिकगडावर ट्रेकिंगसाठी आलेल्या पेणमधील तिघा जणांच्या नवीन वाट शोधण्याचे साहस चांगलेच अंगलट आले. तब्बल आठ तास दरीच्या मध्यावर अडकल्यानंतर मदतीला आलेल्या खोपोलीतील यशवंती हायकर्स, पनवेलच्या निसर्गमित्र संस्थेच्या सदस्यांनी, तसेच स्थानिकांनी तिघा पर्यटकांची सुटका केली.

रविवारी पेण येथून दहा तरुण वडगाव (ता. खालापूर) येथील माणिकगडावर ट्रेकसाठी आले होते. त्यापैकी रोशन अहिरे, देव पटेल व हर्ष कांबळे यांनी माणिकगडावर जाण्यासाठी नेहमीचा मार्ग न निवडता अवघड मार्गाने जाण्याचा निर्णय घेतला. इतर सात जण नेहमीच्या मार्गाने गेले. काही अंतर गड चढल्यानंतर ते तिघे पर्यटक एक बाजूला दरी असलेल्या ठिकाणी अडकून बसले. नवीन वाट शोधण्याचे साहस अंगलट येऊन आपण अडकून बसल्याचे त्या तिघांनी इतर सात मित्रांना कळवले. त्यानंतर तिघांची सुटका करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. वडगाव ग्रामस्थांशी संपर्क साधून मदतीसाठी हालचाली सुरू झाल्या.

दरम्यान, खोपोलीतील यशवंती हायकर्सचे महेंद्र भंडारे, मच्छिंद्र यादव, समीर वाडेकर, तुषार सावंत, इंद्रनील खुरांगले, अरविंद पाटील, योगेश घरत, प्रणीत गावंड, संजय गीलब्बिले, भावेश शिर्के, रूपेश जाधव, संदीप पाटील, पद्माकर गायकवाड तसेच निसर्गमित्र संस्थेचे प्रिसिलिया मदन, अक्षय देशमुख, किशोर म्हात्रे आणि वडगावमधील भूपेंद्र जांभूळकर, स्वप्नील पाटील, राहुल जांभूळकर आणि कृष्णा गडगे दोराच्या सहाय्याने अडकलेल्या तिघांपर्यंत पोहचले. जवळपास आठ तासांनंतर तिघांना सुखरूप सुरक्षित खाली आणले.

# प्राचार्य डॉ. संध्या कुलकर्णी सेवानिवृत्त



**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजच्या प्राचार्य डॉ. संध्या भालचंद्र कुलकर्णी या नियत वयोमानानुसार ३१ जानेवारीला सेवानिवृत्त झाल्या. त्यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संस्थेचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखाली नुकताच कॉलेजमध्ये झाला.

प्रा. हर्षल जोशी यांनी प्रास्ताविक केले. या वेळी डॉ. संध्या कुलकर्णी यांनी आतापर्यंत केलेल्या कार्याची चित्रफीत, तसेच त्यांच्या मुलाने अमेरिकेतून पाठविलेला व्हिडीओ दाखविण्यात आला. नानासाहेब सावंत यांनी डॉ. कुलकर्णी यांना पुढील वाटचालीस व आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य डॉ. कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. या वेळी त्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

संस्थेचे सेक्रेटरी भाऊसाहेब सावंत, डॉ. मोहन दोशी, रामदास पुराणिक, डॉ. कामेरकर, प्राचार्य डॉ. खामकर, करकरे, संदीप अभ्यंकर, राधिका अभ्यंकर, वैभव सावंत, लता सावंत, दिलीप ढेपे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

उपस्थित सर्वांनी प्राचार्य संध्या कुलकर्णी यांचे अभिनंदन करीत त्यांना जीवनातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य कुलकर्णी यांनी सर्वांना धन्यवाद दिले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. मोरे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## आरोग्य प्रहर

# रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्याचे घरगुती उपाय

कोरोना व्हायरसचे संकट पुन्हा एकदा गडद होत आहे. कोरोनाचे नवीन प्रकार वेगाने पसरत आहेत. जगभरात धक्कादायक आकडेवारी समोर येत आहे. तथापि लसीकरण झालेल्या लोकांवर त्याचा परिणाम गंभीर नाही. या दरम्यान तुम्हाला नेहमी मास्क घालणे, सॅनिटायझर वापरणे आणि सामाजिक अंतर पाळणे यासारख्या सुरक्षा उपायांचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो. त्याच वेळी बाह्य संरक्षणाबरोबरच शरीराला आतून मजबूत करणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे, जेणेकरून विषाणू तुमच्या शरीरावर वर्चस्व गाजवू शकत नाहीत. संसर्ग टाळण्यासाठी चांगली प्रतिकारशक्ती असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याच वेळी आपल्याला माहीत आहे का की आपल्या स्वयंपाकघरात अशा काही गोष्टी आहेत ज्यांचे सेवन केल्याने रोग प्रतिकारशक्ती मजबूत होऊ शकते-

**आले-** आले हे हिवाळ्याच्या काळात प्रत्येकाच्या स्वयंपाकघरात असते. आल्यामध्ये अँटी-मायक्रोबियल, अँटीबायोटिकसारखे गुणधर्म असतात. याचे सेवन केल्याने तुमची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. त्यासाठी आले दुधात मिसळून त्याचे सेवन केले जाऊ शकते.

**काळी मिरी-** काळ्या मिरीमध्ये औषधी गुणधर्म असतात, तसेच काळ्या मिरीच्या सेवनाने चेहऱ्यावरील मुरुमांची समस्या दूर होते. जर तुम्ही रोज काळी मिरी खात असाल तर ते तुमची रोगप्रतिकारक शक्ती देखील मजबूत करते. यासाठी तुम्ही ते बारीक करून मध आणि काळे मीठ घालून खाऊ शकता. तुम्ही त्याची पावडर चहामध्ये मिसळून देखील पिऊ शकता. हेच फळे आणि सॅलडमध्येही खाऊ शकता.

**दालचिनी-** दालचिनी हा भारतीय पदार्थांमध्ये आढळणाऱ्या प्रमुख मसाल्यांपैकी एक आहे. रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी अन्नातील चवीनुसार दालचिनीदेखील खूप उपयुक्त आहे. हिवाळ्यात येणाऱ्या विविध आजारांपासून बचाव करण्यासाठी रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी दालचिनीचे सेवन केले जाऊ शकते.



# म्हसळ्यात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात



(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

शासनस्तरावर राबविण्यात येणारे विविध उपक्रम गावाची, तालुक्याची संस्कृती विकसित करीत असते. येथील नागरिक निर्सगाच्या सान्निध्यात आहेत, त्यांनी तो निसर्ग वाचायला शिकले पाहिजे, असे प्रतिपादन म्हसळ्याचे तहसीलदार समीर घारे यांनी येथे केले.

महसूल विभाग, शिक्षण विभाग, सार्वजनिक वाचनालय आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून म्हसळा सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहामध्ये नुकताच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा समारोप करण्यात आला. त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात तहसीलदार समीर घारे उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. जिल्हाधिकाऱ्यांनी सुरू केलेल्या यूपीएससी, एमपीएससीच्या गरूडझेप अंतर्गत कार्यक्रमालाही म्हसळ्यातून चांगली साथ मिळत असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्राचार्य मच्छिंद्र जाधव, मराठी विभाग प्रमुख प्रा. दिगंबर टेकळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, सभापती छाया म्हात्रे, सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष संजय खांबेटे, शाहीन केजीचे डॉ. मुब्बशीर जमादार, केंद्र प्रमुख किशोर मोहिते, वनविभागाचे सूर्यतळ, अतुल अहिरे, प्रियांका चव्हाण आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते.

तत्पूर्वी म्हसळा तहसील कार्यालय ते सार्वजनिक वाचनालय अशी ग्रंथदिंडी काढण्यात आली होती. पोलीस स्टेशन, वनविभाग, नगरपंचायत, केंद्रशाळा, तहसीलदार निवासस्थान, पंचायत समिती कार्यालय, एकात्मिक बालविकास केंद्र येथे दिंडीचे स्वागत करण्यात आले. या वेळी पालखीतील ग्रंथांचे पूजन करण्यात आले.

म्हसळा सार्वजनिक वाचनालयाने या वेळी पुस्तक प्रदर्शन व कव्यवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी आठ विद्यार्थ्यांनी स्वरचित कवितांचे वाचन केले.

# राजनाला कालवा परिसरातील शेतकऱ्यांना भातशेतीत अडथळे

## दुरुस्ती रखडली; शेतकरी हवालदिल

**कर्जत : बातमीदार**

उन्हाळ्यात कर्जत तालुक्यातील राजनाला कालव्याचे पाणी भाताची शेती करण्यासाठी सोडले जाते. या वर्षी पावसाळ्यात कालव्यांना पडलेल्या खांडींची दुरुस्ती वेळेवर झाली नाही, त्यामुळे दुबार शेतीसाठी पाणी येणार नाही. ३५ गावांतील २५०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणाऱ्या राजनाला कालव्यांची दुरुस्ती करणे गरजेचे होते, मात्र पाटबंधारे खात्याच्या यांत्रिकी विभागाने मशिनरी दिली नाही. त्यामुळे या वर्षी जानेवारी महिना संपला, तरी राजनाला कालव्यात पाणी खळाळत नाही.



(छाया : संतोष पेरणे)

टाटा कंपनीच्या आंध्र धरणातून वीज निर्माण केल्यानंतर सोडण्यात येणारे पाणी पेज नदीमधून वाहत जाते. तेच पाणी राजनाला कालवा बांधून शेतीसाठी वळविण्यात आले आहे. हे पाणी मुख्य कालव्यातून उजवा, डावा आणि पोटल कालव्यात सोडले जाते. या पाण्याचा वापर दुबार शेतीसाठी करण्यात येतो. २०११ मध्ये दुरुस्तीसाठी कालव्यात पाणी सोडण्यात आले नव्हते. दुरुस्तीचे काम वेळेवर झाले नाही, म्हणून सलग तीन वर्षे कालव्यातील पाणी बंद ठेवले गेले. त्यामुळे राजनाला कालवा परिसरातील शेतकऱ्यांच्या जमिनी नापीक बनल्या होत्या, तसेच चित्र या वर्षी निर्माण झाले आहे. गेल्या पावसाळ्यात राजनाला कालव्यांना तब्बल १२५ ठिकाणी मोठ्या खांडी पडल्या आहेत, तर १५ ठिकाणी मातीचा भराव वाहून गेला आहे. कालवा दुरुस्तीची कामे करून घेण्याची मागणी स्थानिक शेतकरी ऑक्टोबर २०२१ पासून करीत होते, मात्र पाटबंधारे खात्याच्या उदासीनतेमुळे अद्यापपर्यंत दुरुस्तीची कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. त्यामुळे यंदा राजनाल्याचा मुख्य कालवा, उजवा कालवा आणि पोटल कालव्यात पाणी सोडलेले नाही.

पाटबंधारे खात्याचा यांत्रिकी विभाग निविदा काढून राजनाला कालव्याच्या दुरुस्तीची कामे करून घेत असतो, मात्र या वर्षी निविदा काढण्यास उशीर झाला, तसेच पाटबंधारे खात्याच्या पुणे येथील यांत्रिकी विभागाने कर्जत तालुक्यातील राजनाला कालव्याच्या कामासाठी अवजड मशीन उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे कालव्याची दुरुस्ती नोव्हेंबर महिन्यात झाली नाही.

डिसेंबर महिन्यात पाणी सोडले तर भाताची शेती करता येते, मात्र जानेवारी महिना संपला, तरी राजनाला मुख्य नाला, तसेच उजवा आणि डावा कालव्यात पाणी सोडले गेले नाही. राजनाला कालव्याला पाणी आलेच नाही तर या भागातील जनावरे, विहिरी, बोअरवेल यांनादेखील पाण्याचा तुटवडा जाणवणार आहे आणि सदैव हिरवागार असलेल्या राजनाला कालव्याचा ३५ गावांचा परिसर पाणीटंचाई सदृश होणार आहे.

सध्या पाटबंधारे विभागाकडून एक जेसीबी आणि लहान पोकलेन यांच्या सहाय्याने राजनाला कालव्याला पडलेली भगदाडे बंद करण्याचे काम सुरू आहे, मात्र कालव्याचे मोठे भाग वाहून गेल्याने दुरुस्ती करणे सहज शक्य होणार नाही, हे लक्षात घेऊन पाणी सोडण्यात येणार नाही, अशी नोटीस पाटबंधारे विभागाने बजावली आहे.

# निलगाय शिरली शेतकऱ्याच्या घरात; उपचारानंतर जंगलात रवानगी

**कर्जत : बातमीदार**

काळवीटसारखी दिसणारी जंगलातील निलगाय वांगणी गावातील एका शेतकऱ्याच्या घरात घुसली. या शेतकऱ्याने या निलगायीला बदलापूर पोलिसांच्या ताब्यात दिले आणि पोलिसांनी सर्व नोंदी घेतल्यानंतर निलगायील सुरक्षित जंगलात सोडण्यात आले.

जंगलात रस्ता चुकलेली व कुत्रे मागे लागल्याने घाबरलेली जखमी निलगाय कर्जत तालुक्याच्या हद्दीला लागून असलेल्या वांगणी गावातील कमलाकर जांगरे यांच्या घरात शिरली होती. तिला पाहून सर्वांची तारांबळ उडाली. या निलगायीची माहिती वनविभागला देण्यात आली. वनविभागाचे राऊंड अधिकारी श्रीकांत राऊत यांनी त्यांच्या



पथकासह घटनास्थळी धाव घेतली. या निलगायीची पाहणी केली असता ती जखमी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर चामटोली येथील पाणवठा या अपंग प्राण्यांच्या अनाथाश्रमाचे संचालक गणराज जैन यांच्याशी संपर्क साधण्यात आला. गणराज जैन यांनी पाणवठाच्या काही सदस्यांना घटनास्थळी पाठवले. त्यांनी वनविभागाचे कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने जखमी निलगायीला पाणवठा अनाथाश्रमात दाखल केले. तेथे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. प्रीती म्हात्रे यांनी तिच्यावर उपचार केले. दोन दिवसांनंतर निलगायीला वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले. वनविभागाने निलगायीला सुरक्षित जंगलात सोडले. या वेळी पाणवठा आश्रमाचे गणराज जैन, डॉ. अर्चना जैन, नितीन कांबळे, दत्ता लोहकरे, आकाश हिंदोळा, प्रथमेश त्रिभुवन, प्रसाद दळवी, हेमश्वेता पांचाळ, रोहित गोविलकर, प्रकाश थापा यांच्यासह वनविभागाचे अधिकारी, स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते.

# ग्रंथपाल, प्रयोगशाळा कर्मचाऱ्यांच्या कालबद्ध वेतनश्रेणीबाबत टोलवाटोलवी

## ■ आमदार निरंजन डावखरे यांची नाराजी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्यातील ग्रंथपाल व प्रयोगशाळा कर्मचाऱ्यांच्या कालबद्ध वेतनश्रेणीसंदर्भातील निर्णयासंदर्भात शिक्षण विभागातच टोलवाटोलवी सुरू झाली आहे. या विषयावर शिक्षण संचालकांकडून अतिरिक्त मुख्य सचिवांना निर्णय घेण्याची विनंती करणारे पत्र पाठविण्यात आले आहे. या प्रकाराबद्दल आमदार निरंजन डावखरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, संबंधित पत्र त्वरित रद्द करण्याची मागणी केली आहे.



ग्रंथपाल व प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या कालबद्ध वेतनश्रेणी संदर्भात सहाव्या वेतन आयोगापासून निर्णय घेण्यात आलेला नाही. तर शिक्षण विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू नसल्यामुळे प्रचलित कालबद्ध वेतनश्रेणीचा लाभ आजही दिला जात आहे. राज्य सरकारी व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या वित्त विभागाचे आदेश शिक्षण संचालक कार्यालयाने ग्रंथपाल व प्रयोगशाळांमधील कर्मचाऱ्यांना लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे नुकसान होत आहे, याकडे आमदार निरंजन डावखरे यांनी लक्ष वेधले आहे.

या संदर्भात आमदार निरंजन डावखरे, आमदार ना. गो. गाणार यांच्यासह महाराष्ट्र शिक्षक परिषदेच्या ग्रंथालय शिक्षक विभागाने शिक्षण विभागाकडे पाठपुरावा केला, मात्र शिक्षण संचालक कार्यालयाने चुकीची दुरुस्ती केली नाही. या संदर्भात आमदार डावखरे यांनी शिक्षण संचालक कार्यालयाला पत्राद्वारे संचालनालयाची कालबद्ध संदर्भातील चुकीची धारणा दुरुस्ती करून शिक्षण विभागास सादर करण्याचे आवाहन केले होते, तसेच या संदर्भात न्यायालयीन याचिका दाखल झाल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना जबाबदार धरणार असल्याचा इशारा दिला होता. या पत्राची शिक्षण संचालक कार्यालयाने त्वरित दखल घेऊन प्रधान सचिव कार्यालयाला निर्णय घेण्याची विनंती केली आहे. या टोलवाटोलवीच्या प्रकाराबद्दल आमदार निरंजन डावखरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# पेण कोळीवाड्यात नाखवा, नाखविण पुतळ्याचे अनावरण

**पेण : प्रतिनिधी**

येथील कोळीवाडा चौकात कोळी समाजाचे प्रतिक असणाऱ्या नाखवा आणि नाखविण यांच्या पुतळ्यांचे अनावरण समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

पेण शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासह कासार तलाव येथे साई मंदिर, कवंडाळ तलाव, मोतीराम तलाव येथील सुशोभीकरण, म्हाडा कॉलनी येथील थीम पार्क यामुळे शहराला वेगळे रूप मिळाले आहे.



आता शहरातील कोळी समाजाच्या वतीने एकत्र येत स्वखर्चाने कोळीवाडा चौकात नाखवा आणि नाखविन यांची प्रतिकृती असणारा पुतळा उभारला आहे. हा पुतळा पाहण्यासाठी तालुक्यातील नागरिक येत आहेत. हे स्थळ विशेष सेल्फी पॉईंट बनले आहे.

# कर्जतच्या 'वळण'ला २५ अवॉर्ड

**कर्जत : बातमीदार**

येथील होतकरू कलावंत, लेखक, दिग्दर्शक अशा तिहेरी भूमिकेत वावरणारे प्रदीप गोगटे यांनी वर्षभरापूर्वी निर्माण केलेल्या वळण या शॉर्ट फिल्मने आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. २५ अवॉर्ड, तसेच २७ शॉर्टफिल्म फेस्टिव्हलमध्ये 'वळण' सन्मानित झाली आहे.

उत्कर्ष इव्हेंट्सच्या वळण या शॉर्टफिल्मचे २९ जानेवारी २०२२ रोजी रेकॉर्डिंग झाले होते. या शॉर्टफिल्मने नऊ आंतरराष्ट्रीय स्तरावरील अवॉर्डस्‌सह एकूण २५ अवॉर्ड मिळवून कर्जतचे नाव उंचावले आहे. मुख्य म्हणजे 'वळण'मधील सर्व कलाकार स्थानिक आहेत. यामध्ये ऋत्वी ओसवाल, आरवी ओसवाल, राज साळवी, स्पंदन पडते, साईराज खंडागळे, राजवी डोंबे आणि स्फूर्ती पडते या बालकलाकारांसोबतच पूजा बंदरकर, विशाल रोकडे, आरती, दिगंबर म्हसकर, शर्वरी जाधव आणि हेमंत वाघुले यांनी भूमिका साकारल्या आहेत. कथा आणि दिग्दर्शन प्रदीप गोगटे यांचे आहे. डीओपी हृषिकेश दांडेकर, तर एडिटिंग प्रथमेश जाधव यांनी छान केले आहे. प्रॉडक्शन्स टीममध्ये दिलीप गोगटे, मितेश कोळी, मोहित जाधव, शुभम कलघटगी, नचिकेत लाड, बाबू सकपाळ, तुकाराम जाधव आहेत. स्टुडिओ साऊंड गॅरेजचे संजय पाठक यांचे संगीत, मेकअप अभय शिंदे व फोटो डिझाइन्स माधुरी गोगटे यांचे आहे.

# कडाक्याच्या थंडीचा पशू-पक्ष्यांना फटका

## पोल्ट्रीतील शेकडो कोंबड्या मृत; व्यावसायिक चिंतेत





(छाया : धम्मशील सावंत)

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मागील आठवडाभरात पडलेल्या कडाक्याच्या थंडीचा फटका माणसांसह पशू-पक्ष्यांनादेखील बसला आहे. स्थलांतरित पक्ष्यांची वाताहत झाली आहे. चिमण्या, पाकोळी, धूळ पाकोळी, कोकीळ व कोंबड्या अशा शेकडो पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे पक्षी अभ्यासक व प्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. अनेकांच्या पोल्ट्रीतील शेकडो कोंबड्या मेल्याने व्यावसायिक चिंताग्रस्त झालेत.

माणगाव तालुक्यातील पाटणूस शाळेतील शिक्षक व पक्षी अभ्यासक राम मुंढे विळे गावातून सायकलवरून जात होते. सकाळी थंडी खूप होती. धूळ पाकोळी नावाचा पक्षी रस्त्याच्या कडेला एका झाडाखाली निपचित



पडलेला त्यांना आढळून आला. हातात घेऊन पाहिले असता तो थंडीने पूर्णपणे गारठलेला आणि थरथर कापत होता. त्यांनी त्याला त्यांच्या बॅगमध्ये अगदी सुरक्षित ठेवले.

दर ३० मिनिटांनी त्याचे निरीक्षण केले. बॅगमध्ये उबदार वातावरण असल्याने तो शांत बसून होता. त्यानंतर त्याला सुरक्षितरीत्या सोडून दिले. त्या वातावरणात त्याचे साथीदार आणि जोडीदार असल्याने तो पुन्हा मिसळून गेला.

रोहा तालुक्यातील कोलाड येथील वाईल्डर वेस्ट ॲडव्हेंचर रेस्क्यू टीमचे सदस्य व वन्यजीव रक्षक सागर दहिंबेकर यांना येथील जंगलात थंडीमुळे अनेक चिमण्या व पाकोळी पक्षी मेलेले व निपचित पडलेले आढळले. थंडी असल्याने त्यांना उडता येत नव्हते. तसेच झाड व घरावर त्यांना बसता येत नाही. थंडीमुळे निपचित पडलेल्या कोकीळेला दहिंबेकर यांनी जीवदान दिले, तर शुभम सुतार या पोल्ट्री व्यावसायिकाच्या १९० कोंबड्या थंडीमुळे मृत पावल्या आहेत. पोल्ट्री व्यावसायिकांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**अचानक आलेल्या कडाक्याच्या थंडीचा परिणाम पक्ष्यांवर अधिक प्रमाणात दिसून येत आहे. छोट्या पक्ष्यांना अधिक फटका बसला आहे. त्यामुळे विविध ठिकाणी थंडीने पक्षी मृत व जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत.**
**-राम मुंढे, पक्षी अभ्यासक व निरीक्षक**

**जानेवारी महिन्यामध्ये जम्मू-कश्मीर व हिमाचल प्रदेश या राज्यांमध्ये होणाऱ्या अतिबर्फवृष्टीमुळे उत्तरेकडील राज्यांमध्ये शीतलहर निर्माण झाली आहे. यामुळे आपले पशूधन सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक उपाय योजले जावेत. थंडीमुळे रक्तभिसरण संस्थेवर परिणाम होऊन कार्डीॲक अरेस्ट किंवा कोल्ड शॉकने पक्ष्यांची गती मंदावते किंवा मृत्यूही होतो.**
**-डॉ. प्रशांत कोकरे, पशूधन विकास अधिकारी, सुधागड-पाली**

# 'शिवचरित्र प्रेरणादायीच'

**पोलादपूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची विविध लेखकांनी लिहिलेली चरित्रे सर्वश्रुत आहेत, मात्र शिवचरित्रातून काय बोध घ्यावा, त्यांच्या कोणत्या प्रसंगातून प्रेरणा घ्यावी याबाबतचे मार्गदर्शन जय शिवराय या पुस्तकातून घडते, असे मत शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी व्यक्त केले. पोलादपूर तालुक्यातील कापडे बुद्रुक येथे आयोजित शिवव्याख्यान कार्यक्रमात ते बोलत होते.

दिवंगत माध्यमिक शिक्षक उदय शिंगटे यांची पुस्तके प्रकाशित करणाऱ्या त्यांच्या पत्नी सुप्रिया आणि मातोश्री यांचा कापडे बुद्रुक ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अजय सलागरे व देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. रवींद्र सोमोशी, पोलादपूर पं. स.चे उपसभापती शैलेश सलागरे, मराठी पत्रकार संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर, सेवानिवृत्त नायब तहसीलदार सुभाष जगदाळे, सुरेंद्र जाधव, अमर सलागरे, नारायण साने उपस्थित होते.




## सुधागड शिळोशीत तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू

**पाली** : शिळोशी गावच्या पुलाजवळ अंबाजोड नदीच्या पाण्यात मासेमारीस गेलेल्या पांडुरंग बाळाराम दळवी (वय २५, रा. टेंभी वसाहत, सुधागड) यांचा रविवारी (दि. ३०) पाण्यात बुडून मृत्यू झाला. याबाबत पाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


**पनवेल महानगरपालिका**

**जाहीर ई-निविदा सूचना सन २०२१-२२, व २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी व सन २०२३-२०२४ च्या निविदा मंजूर होईपर्यंतच्या कालावधी करिता**

पनवेल महानगरपालिकेतील विविध विभागाकरिता निविदा पत्रकात नमुद केलेले फर्निचर साहित्य पुरविणे कामी इच्छूक पुरवठादार यांचे कडून जाहीर ई निविदा द्वारे दरपत्रके मगविणेत येत आहे जाहीर ई निविदापत्रकात नमुद केलेले साहित्य पुरविणे कामी कामाची अंदाजित किंमत रक्कम रुपये २४,०२०३४/- मात्र येणे अपेक्षीत आहे. या कामासंबंधीचा सविस्तर तपशील mahatender.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

जा.क्र. पमपा/भांडार/१७/२०२२
दिनांक:- ६/१/२०२२

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७७ (ई-निविदा) सन २०२१-२२**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

**टिप-** या निविदे मध्ये एकूण ०२ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०१.०२.२०२२ सकाळी १०.०० ते दिनांक १५.०२.२०२२ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा. क्र./सा.बां./पनवेल/३९७
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक : ३१/१/२०२२

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
सा.बां.विभाग, पनवेल

**ई-निविदा जाहिरात**

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड अलिबाग या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय पुरुष भिक्षेकरी गृह पुई कोलाड ता. रोहा व शासकीय कृपा महिला वसतिगृह कर्जत जिल्हा रायगड या दोन संस्थेतील प्रवेशितांना सन २०२१-२२ साठी अन्नधान्य, किराणा, मटण, भाजीपाला व इतर तत्सम साहित्यांचा पुरवठ्याबाबत पात्र ठेकेदार कंपनी/संस्थेकडुन पुर्न-निविदा मागविण्यात येत आहेत.

ई-निविदा भरतेवेळी ऑनलाईन ऐनरोलमेंट करणे गरजेचे आहे तसेच डिजिटल सिग्नेचर (ई टोकन) अनिवार्य आहे. सदर माहिती संदर्भात ई-निविदा व कागदपत्राचा तपशिल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर आहे.

| अ.क्र. | तपशिल | वेळ |
|---|---|---|
| १. | ई-निविदा प्रसिध्दी | दि. ३१/०१/२०२२ |
| २. | ई-निविदा खरेदी, प्रिपरेशन व सादरीकरण | दि. ३१/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० ते दि. ११/०२/२०२२ रोजी सायं. ०६.०० पर्यत |
| ३. | ई-निविदा क्लोजिंग | दि. ११/०२/२०२२ रोजी सायं. ०६.०० पर्यंत |
| ४. | ई-निविदा उघडणे | दि. १४/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. किंवा विभागाच्या सोईनुसार |

दि. २७/०१/२०२२
विमाका/कोवि/
२०२१-२०२२/२८४

**सही/-**
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
रायगड अलिबाग

